# ऋणनिर्देश

माझ्या वडिलांचे शिक्षण पाचवीपर्यंत. आई अडाणी. परंतु आपल्याला जे मिळाले नाही ते आपल्या मुलग्याला मिळाले पाहिजे या ध्येयाने प्रेरित झालेले माझे बाबा व आई या दोघांचा यामध्ये मोलाचा वाटा आहे. मी जास्तीत जास्त शिकावे यासाठी मला कशाची कमतरता जाणवू दिली नाही. त्यांच्या आशीर्वादानेच मी एम्.फिल.पूर्ण करण्याचे ठरविले.

शोध निबंधासाठी कोणता विषय असावा या मनोसंभ्रमात असताना माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.भालेराव एच्.एम्. यांनी अनेक विषय सुचविले. त्यापैकी मी "कोल्हापूर शहराची पर्यावरण समस्या व स्थानिक राजकारण : एक अभ्यास" हा विषय निवडला. कारण सद्यपरिस्थितीत याबाबत जाणीव जागृती होणे आवश्यक आहे. या विषयासंदर्भातील उपलब्ध पुस्तके, मासिके, शासकीय पुस्तिका, वेबसाईड्स या सर्वांची माहिती मला सरांनी दिली. प्रत्येक प्रकरण चांगले कसे होईल यासाठी मार्गदर्शन केले. या संशोधनात ते मला दिपस्तंभासारखे आहेत म्हणून मी त्यांचा शतत: ऋणी आहे.

या कामामध्ये विभाग प्रमुख डॉ.अशोक चौसाळकर, डॉ.लक्ष्मीनारायण तारोडी, डॉ.सौ.व्ही.पी.रासम, डॉ.भारती पाटील यांचेही मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर उदय गायकवाड, सुहास वायंगणकर व जीवन बोडके या पर्यावरण प्रेमींनीही मोलाचे सहकार्य केले याशिवाय पी.एस.के.महाविद्यालय, देऊरचे प्राचार्य डॉ.जे.जे.कदम, प्रा.अजितकुमार देसाई, प्रा.कुचेकर (नेसरी महाविद्यालय), यांनीही वेळोवळी मदत केली.

माझ्या आईवडिलांबरोबरच माझ्या बहिणी सुनंदा, गीता, विद्या व लता तसेच मेहुण्यांनीही प्रोत्साहन दिले. तसेच माझे मित्र प्रा.प्रमोद पाटील, राजाराम गायकवाड, दत्ता जाधव, अनिल बाबर, निलकंठ लोखंडे, प्रा.भैरू भालेकर, डॉ.सुधीर पाटील, विशाल मटकर या सर्वांनी वेळोवेळी मला सहकार्य केले त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

- **पांडुरंग विष्णू पाटील**